॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

आज़ादी का अमृत महोत्सव

Phone: (02462) 215242 (Ext. - 152)
Fax:(02462) 215572

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Website: srtmun.ac.in
email: affiliation@srtmun.ac.in

महाविद्यालय विकास समिती स्थापन करणे बाबत.

## :: परिपत्रक ::

संदर्भ :– ०१. महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (९७)

०२. मा. अध्यक्ष/सचिव, नॅशनल असोसिएशन ऑफ टिचर्स इन हायर एज्युकेशन (नाथे) मुख्य कार्यालय: सत्यजीत निवास, हर्ष नगर (श्यामनगरच्या पाठीमागे) नांदेड–४३१ यांचे महाविद्यालयात महाविद्यालय विकास समिती स्थापन अनिवार्य करणे बाबतचे निवेदन.

उपरोक्त संदर्भ क्र. ०२ अन्वये मा. अध्यक्ष/सचिव, नॅशनल असोसिएशन ऑफ टिचर्स इन हायर एज्युकेशन (नाथे) यांनी प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत बहुतांश महाविद्यालयात महाविद्यालय विकास समिती स्थापन आहे तर कांही महाविद्यालयात अद्याप महाविद्यालय विकास समिती स्थापन केलेली नाही असे आढळून आलेले आहे. वास्तवीक महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम २०१६ चे कलम (९७) नुसार महाविद्यालयात महाविद्यालय विकास समिती स्थापन होणे हे प्राध्यापक, कर्मचारी व महाविद्यालयाच्या विकासाकरीता सर्वात महत्वाची समिती आहे असे कळविलेले आहे.

महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (५) व पोट कलम (क) नुसार शैक्षणिक व प्रशासकीय आणि पायाभुत सुविधा, (ख) नुसार महाविद्यालयात एकुण अध्यापक कार्यक्रम वेळापत्रक व सुधारणा ठरवितो, (ट) विद्यार्थी कर्मचा–यांचा कल्याण कार्यक्रम आखणे, (ण) महाविद्यालयात शिस्त सुरक्षितता व सुरक्षा प्रश्नाकरीता प्रशासनास शिफारस, (त) नॅक अहवाल इत्यादी विचार व शिफारस करील या सदरील बाबी महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियमात उद्देशिका म्हणून समायोजन केलेले आहे.

तसेच सदरील महाविद्यालय हे जर महाविद्यालय विकास समिती स्थापन करीत नसेल तर ते प्राध्यापकांच्या हक्काचे उल्लंघण आहे. सदरील समितीद्वारे प्राध्यापकांच्या सर्वांगीण विकासाकरीता व त्यांच्या न्याय हक्काचे व संविधानीक व्यवस्था असणारे प्रशासकीय मंडळ आहे. या समितीद्वारे प्राध्यापकांना न्याय हक्क मिळत असतो. त्यामुळे सदरील बाबींची विद्यापीठाने तात्काळ दखल घेवून महाविद्यालय विकास समिती सी.डी.सी. स्थापन करण्यासंदर्भात सर्व संलग्नीत महाविद्यालयांना आदेशीत करावे. विद्यापीठाने तशा कांही अटी त्यांना घालाव्यात जसे की विद्यापीठाशी संलग्नीकरण करताना सी.डी.सी. म्हणजे महाविद्यालय विकास समिती स्थापन करणे अनिवार्य अट ठेवावी व तसेच नॅक मुल्यांकन करताना विद्यापीठातून रिझल्ट रजिस्टर शीटची गरज असते त्यासाठी पण सी.डी.सी. ची अट ठेवावी असेही कळविलेले आहे.

याबाबत प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. ०२ च्या अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनीक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम (९७) नुसार महाविद्यालयात महाविद्यालय विकास समिती स्थापन करण्यात यावी.

सदर परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmu.ac.in या संकेतस्थळवार affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करण्यात येत आहे.

''ज्ञानतीर्थ'', परिसर,
विष्णूपुरी, नांदेड–४३१ ६०६
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न–०३/२०२४–२०२५/1457
दिनांक :– १७/०२/२०२५.

उपकुलसचिव
शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव :–

१. मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
२. सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक (संलग्नीकरण) विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांना देऊन कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर Affiliation या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.